दिव्य मराठी

अमरावती, गुरुवार, दि. १ जून २०२३

उपक्रम • पुणे येथील एमआयटीच्या पुढाकाराने 'राष्ट्रीय विधायक संमेलन'

# १५ ते १७ जून दरम्यान देशभरातील आमदार मुंबईतील मंचावर येणार एकत्र

प्रतिनिधी | अमरावती

नेतृत्व, लोकशाही, प्रशासन आणि शांतताप्रिय समाज निर्माण करण्यासाठी भारताच्या इतिहासामध्ये प्रथमच देशातील दोन हजाराहून अधिक आमदार एकत्र येत आहेत. पुणे येथील एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंटतर्फे आयोजित 'राष्ट्रीय विधायक संमेलन' हे मुंबई येथील बीकेसी जीओ सेंटरमध्ये १५ ते १७ जूनदरम्यान होत असून त्यासाठी हे आमदार एकत्र येत असल्याची माहिती माजी महापौर चेतन गावंडे व एमआयटी राष्ट्रीय सरपंच संसदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांनी प्रसिद्धी माध्यमांच्या प्रतिनिधींना दिली. देशातील सर्व राज्याचे विधानसभा व विधान परिषदेचे अध्यक्ष, सभापती यांच्या सहकार्याने हे संमेलन होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

राष्ट्रीय विधायक संमेलनामध्ये एकत्र येणारे हे सर्वपक्षीय आमदार एकाच मंचावर विचार विनिमय करणार आहेत. दरम्यान राज्यातील सर्व पक्षातील आमदारांनी या संमेलनात सहभागी होऊन लोकशाहीला अधिक सशक्त करण्यास योगदान दयावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. राष्ट्रनिर्माण, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सर्वांगीण शाश्वत विकास या मध्यवर्ती त्रिसूत्रीचा प्रमुख उद्देश समोर ठेऊन आयोजित या संमेलनाचे उद्घाटन १६ जून रोजी होणार आहे. तर १७ जून रोजी या संमेलनाचा समारोप होईल. या व्यतिरिक्त ४० समांतर सत्र आणि गोलमेज परिषदही होणार आहे. लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन, डॉ. मीरा कुमार, शिवराज पाटील चाकुरकर, मनोहर जोशी तसेच लोकसभेचे विद्यमान सभापती ओम बिर्ला हे या संमेलनाचे मार्गदर्शक व संयोजक आहेत. एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे संस्थापक अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या विचार चिंतनातून 'राष्ट्रीय विधायक संमेलन भारत' ही संकल्पना साकारली आहे. ते या संमेलनाचे प्रमुख संयोजक तथा समन्वयक आहेत.



पत्रकार परिषदेत भूमिका मांडताना माजी महापौर चेतन गावंडे, एमआयटी राष्ट्रीय सरपंच संसदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील. शेजारी इतर मान्यवर.

हे संमेलन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर व दिलीप वळसे पाटील यांच्या विशेष सहकार्याने होत आहे. प्रत्येक सत्रांमध्ये ५० आमदार चर्चा करणार आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक सत्राचे अध्यक्षपद विधानसभेचे सभापती, विधान परिषदेचे अध्यक्ष, संसदीय कार्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता हे भूषविणार आहेत.

राष्ट्रीय विधायक संमेलनासाठी आतापर्यंत भारतातील सर्व राज्यातील एकूण १८०० आमदारांनी सहमती दर्शवली असून एकूण २५०० आमदार येण्याची शक्यता असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. राष्ट्रीय विधायक संमेलन हे देशातील वेगवेगळ्या राज्यातील आमदारांना एकमेकांमध्ये संवाद घडविणे, सुशासनाच्या मुद्यांवर शिकणे आणि लोकशाहीला शक्तीशाली बनविण्यासाठी निर्माण केले गेले आहे. यावेळी एमआयटी राष्ट्रीय सरपंच संसदेचे सह समन्वयक प्रकाश महाले, अभय खेडकर गजानन मिरगे, प्रफुल बानगावकर, नितीन राजवैद्य, एमआयटीचे जनसंपर्क अधिकारी संजय कैकाडे आदी उपस्थित होते.

## हे आहे संमेलनाचे विचारसूत्र

राष्ट्रीय एकात्मिकतेचा, राष्ट्रीय लोकशाहीच्या सर्वांगीण सशक्तीकरणाचा आणि राष्ट्राच्या सर्वांगीण शाश्वत विकासाचा कृतिशील विचार देशातील विविध राज्यांनी स्वतंत्र व एककल्ली न करता त्यांचे राज्य म्हणून असणारे स्वातंत्र्य व वैविध्य जपत एकत्रित, एकात्मिकपणे करणे अधिक व्यवहार्य ठरणारे आहे. प्रामुख्याने हे विचारसुत्र समोर ठेवून देशातील सर्व आमदारांना एकाच व्यासपीठावर एकत्रित आणणारे हे संमेलन म्हणूनच फार पायाभूत कार्य साधणारे ठरणार आहे.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.